म. ग्रं. सं. ठाणें
विषय बाल-वाङमय
ग्रा. नं. १८२

# स्वाध्याय-माला

बाल वाङ्मय

## परदेशी मेवा

लेखक

द. के. बर्वे

प्रथम विभाग




अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणें २

३९२८

# परदेशी मेवा

– लेखक –

श्री. द. के. बर्वे,
बी. ए., बी. टी., पुणें.

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बा. क्र. 3926 नों. दि. ..........
वि. वा.वा. क्र. ..........

संच ८ वा पुष्प १७० वें

१९४९ ] [ किं. ६ आणे

IRBK-0103127

IRBK-0103127

# परदेशी मेवा

सर्वाधिकार स्वरक्षित

## संपादकीय

खास बालवाचकांच्यासाठींच हा मेवा आम्ही देत आहों. परंतु हा मेवा पोटासाठीं नसून डोक्यासाठीं आहे. कारण यांतील दोन सुंदर गोष्टींवरून आमच्या बालवाचकांनीं योग्य तो धडा घ्यावा. दुसऱ्याच्या वस्तू, मग त्या कितीहि चांगल्या अगर उपयुक्त असल्या तरी त्याला न विचारतां, फसवून घेणें हें वाईटच. त्याबद्दल काय शिक्षा मिळते हें "जादूचे हातरुमाल" यांत वाचा. तसेंच श्रीमंत मनुष्य झाला तरी त्यानें दीन, गरीब लोकांना, याचकांना हिडीस–फिडीस करूं नये हें वाचकांना 'तीन भाऊ' या गोष्टीवरून समजेल.

हें पुस्तक बालविहार मालेतर्फे प्रकाशित होणार होतें व तें छापूनहि झालें होतें. परंतु कांहीं अपरिहार्य कारणामुळें ती माला प्रकाशित न होऊं शकल्यामुळें हें पुस्तक स्वाध्यायमालेतर्फे प्रकाशित करीत आहोंत.

### १. मालेंतील पुस्तकांचा उपयोग :

(१) सुसंस्कृत नागरिकाला आवश्यक असें ज्ञान या पुस्तकांच्या वाचनानें मिळतें.

(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयास पूरक अशी माहिती या पुस्तकांत दिलेली आहे.

(३) घरांतील खाजगी ग्रंथालयें व शिक्षण या संस्थांचीं वाचनालयें व प्रौढांचे शिक्षणवर्ग यासाठीं.

(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगीं देण्यासाठीं, शाळा, कॉलेज अगर तत्सम संमेलनप्रसंगीं पारितोषिक म्हणून.

### २. पुस्तकांतील विषयांचें स्वरूप :

(१) सुसंस्कृत नागरिकांस असें वाटत असतें कीं, आपल्या सभोंवतालच्या वस्तु (विमान, रेडिओ, विजेची शक्ति इ.); राजकारणांतील चालू प्रश्न (मजूरपक्ष, घटना समिति इ.); थोर पूर्वजांचीं चरित्रें, निरनिराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास—यांची माहिती आपणांस असावी. मालेसाठीं विषय निवडतांना वरील दृष्टि ठेविली आहे.

(२) शाळेंत स्थूल मानानें ज्या विषयांचें शिक्षण होतें त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीहि या पुस्तकांतून असते.

(३) मनोरंजक पद्धतीनें उपयुक्त विषयांचें ज्ञान, शाळा कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरबसल्या देणें हा मालेचा हेतु आहे.

**किंमत–पुष्प १६१ पासून प्रत्येक पुष्पाची किंमत सहा आणे आहे.**

मुद्रक व प्रकाशक–**वि. गं. केतकर**, लोकसंग्रह छापखाना, ६२४, सदाशिव, पुणें, २.

१०५९८

## जादूचे हात रुमाल : १

( रशियन कथा )

एक होता म्हातारा नि एक होती म्हातारी. म्हतारा बिचारा भोळा, शांत नि सालस तर म्हातारी मोठी भांडकुदळ नि कांगावखोर. रागीट तर अशी कीं रागाच्या भरांत नवऱ्याला हातांतल्या केरसुणीनें सुद्धां बदडून काढायची.

एका अरण्याच्या जवळ एक लहानशी झोंपडी घालून हें गरीब जोडपें राही. म्हतारेबुवा दिवसां रानांत जाऊन खूप पक्षी धरून आणीत नि म्हातारीबाई फळें-फुलें पालापाचोळा विकून संसार चालवी. म्हातारी एकादेवेळीं कांगावा करून आजोबांना नकोनकोसें करी, पण म्हातारेबुवा भांडण न वाढवितां निमुटपणें घरांतून पाय काढीत, आपल्या एका 'काकू'कडे जाऊन रहात आणि तास दोन तासांनीं परत येत. या म्हतारेबुवांची काकी म्हणजे पहाना केवढी म्हातारी असेल ती. ऐशीच्या घरांत आली होती, पण होती मात्र चांगली

टुणटुणीत. तिच्या घरांत सुना, लेकी, नातू, पणतु असा गोतावळा मोठा होता. त्यामुळं घरांत खाण्यापिण्याची नेहमीं टंचाई असे. म्हातारेबुवा आधूनमधून एकादी चांगली शिकार मिळाली कीं काकीला नेऊन देत. आणि तोंडापुरतं कां होईना, काकूकडून कौतुक झालं कीं म्हातारेबुवांना हायसं वाटे. घरांत बायको नेहमीच हिडिस फिडिस करी त्यामुळें ते कातावून जात. यामुळें काकींच घर ही त्यांना मोठी निवाऱ्याची जागा वाटे.

एकदां काय झालं. आजोबा अरण्यांत एका तळ्यापाशीं जाळें टाकून बसले होते. रात्र पडायची वेळ झाली तरी एकहि पक्षी तिकडे फिरकेना. आजोबांना मोठी चिंता पडली. घरीं बायकोचं ' चौदावं रत्न ' मिळणार, नि शिकार नाहीं म्हणून उपासमार निराळीच ! अशा विवंचनेंत ते आहेत तोंच एक मोठा बगळा उडत उडत तेथें आला नि नेमका जाळ्यांत सांपडला. अत्यंत आनंदानें म्हतारबुवांनीं जाळें गुंडाळलें, तों काय आश्चर्य ? तो बगळा माणसासारखा बोलूं लागला. "बाबा, मला जीवन द्या. मला तुमचा पोटचा पुत्र समजा. तुम्हांला मूलबाळ नाहीं. मीच तुमचा मुलगा. मला सोडून द्या. तुमचे उपकार मी विसरणार नाहीं. उद्यां सकाळीं याच ठिकाणीं या तुमच्या उपकाराची फेड मी करीन"

तो बोलका बगळा पाहून आजोबांना भीति, अचंबा नि दया वाटली. त्या बगळ्याला सोडून देऊन आजोबा हात हालवीत परत आले. त्यांच्या कजाग बायकोनें नवऱ्याला

उपाशीं टेवून थंडींत उघड्यावर झोंपायची शिक्षा दिली. शिवाय शिव्यांचा भडिमार झाला तो निराळाच. बिचारे आजोबा! पाठ सैल झाली नाहीं यांतच समाधान मानून सारी रात्र त्यांनीं कुडकुडत काढली.

ॐ ॐ ॐ

दुसरे दिवशीं मोठ्या सकाळीं उठून आजोबा कालच्या ठिकाणीं आले. बगळोबाची स्वारी तळ्याकाठीं बकध्यान करीत बसली होती. आजोबा येतांच जवळच ठेवलेला एक निळा हातरुमाल बगळ्यानें आपल्या चोंचींत धरून आजोबांना दिला आणि म्हटलें, "बाबा, ही माझी भेट. हा तुमच्याजवळ जपून ठेवा. तुम्हाला खाण्यापिण्याची ददात कधींहि पडणार नाहीं." मग त्याचा उपयोग कसा करायचा हें बगळ्यानें आजोबांना समजावून सांगितलें.

भुकेलेला आजोबा त्या हातरुमालाचा 'प्रयोग' पहाण्यास अधीर झाले. कदाचित् बगळ्यानं आपल्याला बनवलं तर नसेल असाहि विचार त्यांच्या मनांत आला. एका झाडाखालीं बसून त्यानीं हातरुमाल हंथरला आणि म्हणाले, "दोघांनो, चला बाहेर या".

त्याबरोबर काय चमत्कार? दोन नवजवान तरूण एकदम कोठूनसे आले. एकाच्या हातांत पंचपक्वान्नाचें ताट होतें. दुसऱ्याचें हातांत खाद्यपदार्थांनीं भरलेलीं पांच सात मोठालीं भांडीं होतीं. जेवणाचें ताट आजोबांच्या पुढें मांडून तो चाकर म्हणाला. "बसा आजोबा, जेवायला." आजोबा भीत भीत

बसले. इतकं चमचमीत उंची नि सुग्रास जेवण त्यांच्या बायकोनं त्यांना उभ्या जन्मांत वाढलं नव्हतं. थानांत काय कमी होतं ! खिमा होता, पुलाव होता, ऑमलेट, चिकनसूप, बिऱ्याणी, सागुती, सारं सारं कांहीं होतं. भिटक्या मारीत आजोबा 'ओ' होईतों जेवले. दुसऱ्या नोकरानें त्यांना जेवण पोटभर वाढलं. जेवण होतांच एकानं हात धुवायला पाणी दिलं, दुसऱ्यानं हात-पुसणं दिलं. आजोबानीं हुकूम सोडला, "दोघानों, आंत चला" त्याबरोबर हातरुमालावर उभे राहून ते दिसेनासे झाले.

आतां आजोबांना हा चमत्कार आपल्या काकीला केव्हां दाखवूं असं झालं. चालवेल तितकं जल्द चालत आजोबा काकीच्या घरीं आले नि आनंदानें ओरडून म्हणाले, "चलाग, पोरीनों, पोरानो, या या लवकर, काकी, मी तुम्हा सगळ्या सगळ्यांना आज थाटाची मेजवानी देणार आहे".

"काय बाई, चेष्टा करतोस रे इतका म्हातारा झालास तरी. एक चिटपाखरूं तरी आणलं आहेस का चटणी पुरतं ? तुझ्या गप्पाच ऐकाव्या लांब लांब."

"छेः, छेः, काकी थट्टा नव्हे हं. पहाच आतां" असं म्हणून त्यानीं स्वयंपाकघरांत हातरुमाल हंतरला ; आणि हुकूम सोडला, "चला रे, दोघांनो बाहेर या" मघाचे नोकर लगेच जेवणाचीं ताटें घेऊनच हजर झाले. "चला, या सगळ्यांना ताटं ठेवून पोटभर जेवण वाढा" काकीचा सगळा गोतावळा जेवायला बसला, सगळ्यांच्या पुढें पक्वान्नाचीं ताटें

झळकूं लागलीं. मुली म्हणाल्या. "आजोबा, तुम्ही बसाना जेवायला".

"छेः नको बाळ, मी आतांच पोटभर जेवलों".

"पण काय रे, ही भुताटकी तर नसेल ना?" काकीनें शंका काढली.

"छेः ग, ही देवाची देणगी आहे बरं" असं म्हणून आजोबानीं हातरुमालाची हकीगत काकीला सांगितली. मग काका म्हणाले, "तुम्ही निवान्तपणें जेवा हो. हवें तें मागून घ्या. तोंवर मी आंघोळ करून घेतों" काका न्हाणीघरांत गेले. काकीला आतां हांव सुटली. हातरुमाल लांबवायाचा कसा याचे दुष्ट विचार तिच्या डोक्यांत घोळूं लागले. अंघोळ आटोपून आजोबा आले तेव्हां सगळ्यांचीं जेवणें आटोपलीं होतीं. त्यानीं हुकूम दिला "दोघांनो, आंत चला" त्या बरोबर हातरुमालावर उभे राहून ते दोघे तरुण नोकर दिसेनासे झाले आणि अन्न, भांडीं सर्व कांहीं अदृश्य झालें. आजोबांनीं तो रुमाल खिशांत ठेवला नि म्हणाले, "काकी, मला रात्रीं थंडींत झोप नीट लागली नाहीं, मी इथंच तुझ्या घरांत माडीवर जरा लवंडतो". लगेच काकी आनंदानें म्हणाली, "हो, झोपना खुशाल, तूं मला परका का रे आहेस?"

म्हातारेबुवा लवंडले नि थोड्या वेळांत डारढूर घोरूंहि लागले. काकीनें डाव साधला. त्यांच्या खिशांतला हातरुमाल शिताफीनें काढून घेऊन अगदीं तसाच दिसणारा दुसरा एक निळा हातरुमाल त्यांच्या खिशांत व्यवस्थित ठेवून दिला.

दिवस उतरल्यावर आजोबा जागे झाले. काकीकडे चहा घेऊन ते आपल्या घरीं मोठ्या समाधानानें आले. दारांतच त्यांची 'त्राटिका' बायको दांत ओठ खात उभी होती. त्यांचें दर्शन होतांच ती कडाडली, "काय हो, काय आरंभलंय तुम्ही हें ? कसली अवदसा आठवली तुम्हाला, कां म्हातारचळ लागलाय ? एवढी तुमची लग्नाची बायको बिचारी भूक भूक करून प्राण सोडते आहे तरी पत्ता सुद्धां नाहीं तुमचा. नि सारी शिकार काकीच्या–त्या थेरडीच्या,–इथं नेऊन पंचपक्वान्नांच्या पंक्ति उठतात. चांगलं करताय हो. तुमच्या तोंडांत किडे पडोत. देवा या थेरड्याला नरकांत लोटूं दे. तुम्हाला हालहाल करून उपाशी मारीन तरच मी नांवाची."

पण आजोबा बायकोच्या कांगाव्याला आज घाबरले नाहींत. आज त्यांच्या हातांत प्रत्यक्ष 'अन्नपूर्णादेवी' होती. ते शांतपणें बायकोला म्हणाले, "अग, थांब ओरडूं नको अशी. मी काय जादू आणली आहे पहा तर खरी. असं सुग्रास भोजन घालतों तुला कीं एकदां जेवलीस कीं जन्मभर भूक भूक करायची नाहींस." भुकेनें कातावलेली ती म्हातारी बडबडत असतांच हातरुमाल हंतरून आजोबानीं ऐटीनें हुकूम सोडला, "चला रे, दोघांनो बाहेर या." पण एक मिनिट दोन मिनिटें, अर्धातास झाला. हातरुमालांतून कोणीच बाहेर येईना. आजोबांची बोबडी वळली. खरा प्रकार त्यांच्या लक्षांत आला. 'काकीनं बनवलं एकूण ! ते स्वतःशीं निराशेनें उद्गारले. हा सारा प्रकार पहात असतांच भुकेलेल्या त्यांच्या बाय-

कोचा पारा मात्र भलताच चढला. शिव्यांचा खूप भडिमार करून शेवटीं नेहमीप्रमाणें केरसुणीनें आजोबांना बडवीत नि त्यांचे गालगुच्चे घेत ती घसा फोडून ओरडूं लागली, "मला उपाशी मारतां. वर आणखी थट्टा करतां? देवा, यांचं वाटोळं होऊं दे. नाहीं तर मला तरी सोडव रे बाबा."

--अर्थातच, त्या रात्रींहि, कालच्या प्रमाणेंच आजोबांची हकालपट्टी झाली. सारी रात्र कडक थंडींत हंतरुणा-पांघरुणाशिवाय काढून आजोबा सकाळीं काकीकडे गेले. पण ती बिलंदर काकी भोळ्या आजोबांना थोडीच दाद लागूं देते? आजोबानीं खरा हातरुमाल परत देण्याविषयीं पदोपदीं विनवलें पण कानावर हात ठेवून तिचें एक उत्तर, "असलं कधीं केलं नाहीं रे बाबा मी उभ्या जन्मांत. मला कांहीं सुद्धां ठाऊक नाहीं."

पण तिच्याशिवाय दुसऱ्या कोणीतरी हातरुमाल घेतला असणें शक्यच नाहीं ही आजोबांची पक्की खात्री होती. अखेर निरुपायानें काकीच्या घरांतून बाहेर पडून ते रानांत कालच्या तळ्याच्या कांठीं येऊन बसले. थोड्याच वेळांत बगळा आला. त्यानें विचारलें, "बाबा, दुःखी कां?" आजोबांनीं सगळी हकिगत सांगितली. "थांबा, आलोंच" असें म्हणून बगळा उडाला नि थोड्यांच वेळांत कालच्या सारखाच दिसणारा एक हातरुमाल चोचींतून आणून त्यानें आजोबांना दिला, बगळा बोलला, "बाबा, आतां हा जपून वापरा. हुकुम काल-च्या सारखेच सोडायचे. जा. मात्र आतां पुनः येऊं नका."

आनंदानें तो घेऊन म्हाताराबुवा एका झाडाखालीं बसले. काल दुपारचें जेवण जिरून जाऊन आतां त्यांना कडकडीत भूक लागली होती. कालच्या सुग्रास पक्वान्नांच्या मिष्टास आठवणी करीत आजोबानीं हुकूम सोडला, "चला रे, दोघांनो बाहेर या" त्याच क्षणीं दोन जवानमर्द तेथें अचानक हजर झाले. पण अरे बापरे, त्यांच्या हातांत ताटें नव्हतीं, सोटे होते. आजोबा घाबरले. अरेरे, बगळ्यानंहि आपणाला बनवलं एकूण! असा विचार त्यांच्या मनांत आला न आला तोंच, त्या दोन मर्दांपैकीं एकजण म्हणाला, "गोड शब्दांना भुलूं नको, काकीशीं मैत्री ठेवूं नको" असें म्हणून त्यानें हातांतील सोट्याचा प्रसाद आजोबांना दिला. दुसऱ्यानेंहि तेंच वाक्य म्हणून आजोबाच्या पाठींत सोटा घातला. अधिक पाठ मऊ होण्यापूर्वींच, धीर करून आजोबानीं हुकूम सोडला, "दोघांनो, आंत चला" लगेच ते दोन जवानमर्द हातरुमालावर उभे राहून अदृश्य झाले. आजोबांच्या डोक्यांत आतां प्रकाश पडला. बगळ्यानं आपणाला मुद्दामच हा रुमाल दिला नसेल कशावरून?

लगेच ते काकीच्या घरीं जाऊन तिला म्हणाले, "काकी, उगीच तुझ्यावर मी चोरीचा आळ घेतला हो. हा पहा. माझा रुमाल तर मजकडेच होता. आतां खिशांतच सांपडला. म्हातारपणामुळें अशी विसर पडते बघ बरं. आतां रागावूं नको हो. हा रुमाल मी इथंच ठेवतो खुंटीवर. नीट लक्ष ठेव. मी

आंघोळ करून येतों. मग कालच्या सारखं सगळीं मिळून आपण आरामांत जेवूं."

× × ×

स्वयंपाकघरांतल्या खुंटाळ्यावर तो रुमाल ठेवून आजोबा न्हाणीघरांत गेले. ते आंघोळ न करतांच तिथें बसले. काकीला आज तो दुसरा रुमाल चोरण्याची दुष्पट हाव सुटली. तसाच एक निळा हातरुमाल झटकन मिळवून आणून तिनें खुंटाळ्यावर ठेवला नि माजघरांत एका बाजूस कोपऱ्यांत बसून प्रयोग करायला सुरवात केली. तिला मंत्र पाठ झाला होता. तों सोटे घेऊन ते जवानमर्द यमदूतासारखे तिच्या दोन्ही बाजूस उभे राहिले. म्हाताऱ्या काकीची घाबरगुंडी उडाली. एक जवान म्हणाला, "गरीब म्हताऱ्याला फसवूं नको, म्हाताऱ्याचा रुमाल चोरूं नको." दुसरा म्हणाला, "म्हाताऱ्याचा रुमाल आधीं परत दे." असे म्हणून दोघां जवानमर्दांनीं आळीपाळीनें काकीला 'प्रसाद' द्यायला सुरवात केली. काकी त्यांना चुकविण्यासाठीं आरडा ओरड करीत घरभर धांवत सुटली. घरांतलीं सगळीं लहानथोर मंडळीहि गडबडून जाऊन तो प्रकार पाहूं लागली. पण तिला सोडविण्यासाठीं एकदोन धीट लोक पुढें झालें त्यांनाहि सोट्याचा प्रसाद चांगला खरपूस मिळाला. तेव्हां मध्यें पडण्याची कोणाची छाती होईना. न्हाणीघरांत बसलेल्या आजोबांना सारें ऐकूं जात होतें. काकीच्या पोरीबाळी न्हाणीघराचें दार सारखें धडकून त्यांना बाहेर बोलवीत होत्या. पण दरवेळीं आजोबा ओरडून सांगत

होते, "थांबा हं. एवढा साबण लावून दोन तपेल्या घेतो नि येतों."

काकी मोठी चिकट. तिला वाटे हा मार आतां थांबेल, मग थांबेल, नि चोरलेला हातरुमाल पचून जाईल. ती कळवळून त्या मारेकऱ्यांना म्हणे, "पुरे रे, पुरे अय्याई ऽऽऽ" पण त्याचं उत्तर एक "चोरलेला हातरुमाल म्हाताऱ्याला परत दे."

अखेर दुसरा कांहीं उपाय नाहींसें पाहून, मारानें अंग चांगलें सडकून निघाल्यावर काकीनें तो चोरलेला हातरुमाल एकदांचा पेटींतून बाहेर काढला. नि त्या जवानमर्दांच्या पुढें 'घ्या एकदा' म्हणून भिरकावला. "आम्हांला नको तो, त्या आजोबाला दे" एकानें दरडावून सांगितलें. पण आजोबा तरी काय कमीचे ! ते न्हाणीघरांतून बाहेर येईनात नि पुनः काकीची पाठ सैल होऊं लागली. अखेर काकी धांवत न्हाणीघराच्या दारापाशीं जाऊन ओरडली, "थेरड्या, घे एकदांचा तुझा कालचा हातरुमाल. पण मेल्या बाहेर येऊन मला एकदां या यमयातनांतून सोडव." असें म्हणून दाराच्या फटीतून तो हातरुमाल काकीनें न्हाणीघरांत सारला. हा तरी खरोखरीचा आपलाच हातरुमाल आहे याची प्रचीति पाहूनच आजोबा न्हाणीघराबाहेर आले. तोंवर काकीला आणखी चार दोन धपाटे मिळाले होतेच. काकी रडत होती तें पाहून आजोबांना दया आली. "दोघांनो, आंत चला" त्यांनीं हुकूम सोडला. तशी हातरुमालावर जाऊन ते जवानमर्द अदृश्य झाले.

काकांनीं आतां दोन्हीहि सारखेच दिसणारे आपले निळे हातरुमाल खिशांत ठेवून काकीशीं अधिक कांहीं न बोलतांच घरचा रस्ता सुधारला. घरीं बायको चंडिकेचा अवतार धरून बसली होतीच. म्हातारेबुवांनीं आल्याबरोबर 'अन्नदाता' हातरुमाल जमिनीवर हंतरला नि म्हणाले, "चला रे, दोघांनो बाहेर या." त्या बरोबर सुग्रास अन्नाची मोठालीं ताटें घेऊन कालचे तेच तरुण अचानक हजर! म्हातारीचा राग पार पळाला. पण कांहीं शंका येऊन ती म्हणाली, "मला विष घालून मारतोय होय?" आजोबा हंसून म्हणाले, "हत् वेडे, हें देवाचं अन्न आहे. अमृत आहे. खाऊन तर पहा." तीन दिवसांची उपाशी ती म्हातारी मग कांहीं शंका न काढतां अधाशीपणें मचांमचां जेवली. आजोबाहि तिच्या शेजारींच बसून जेवूं लागले. एकेक घांसाबरोबर तिचा राग पार पळून जाऊं लागला नि अर्ध्या जेवणानंतर नवऱ्याशीं ती खूप खूप गोड गोड गोष्टी बोलूं लागली. "हवं तें मागून घ्या" तो वाढपी म्हणत होता. आजोबा खूप खूप उंची उंची पदार्थ मागवीत होते. नि तो कोठूनसे आणून त्या दोघांना आग्रहानें वाढीत होता.

म्हातारीनें जेवण झाल्यावर नवऱ्याला समाधानानें विचारलें, "असलं हें अमृताचं जेवण आतां आपल्याला रोज मिळेल?"

"हो, अगदीं मरेंतोंपर्यंत" आजोबा उत्तरले. म्हातारीचे ऊर आनंद नि कृतज्ञतेनें भरून आलें.

यानंतर आणखीन एक मौज अचानक झाली. त्या दोन हातरुमालांपैकीं 'मारकुटा' हातरुमाल सहजच घरीं विसरून आजोबा आपल्या एका मित्राकडे बसायला गेले होते. तोंच म्हातारीला खायची हुक्की आली. तिनें तो रुमाल हंतरून हुकूम सोडला, "चला रे दोघांनो बाहेर या" त्याबरोबर सोटे घेतलेले दोन जवानमर्द तिला बोकलूं लागले. बिचारीची घाबरगुंडी उडाली. "गरीब नवऱ्याला मारतेस काय?" असें म्हणत ते तिला बडवूं लागले. तेव्हां ती धांवत सुटली. सुदैवानें तितक्यांत आजोबा घरीं परत आले. ओठावरचें हंसूं दाबून आजोबांनीं हुकुम सोडला, "दोघांनो, आंत चला." लगेच ते जवानमर्द दिसेनासे झाले.

——मात्र तेव्हांपासून आजोबांनीं तो मारकुटा हातरुमाल कडीकुलुपांत नीट ठेवून टाकला आहे. आतां ती आजा आजी पहा कशी गुण्यागोविंदानं खाऊन पिऊन मजेंत रहात आहेत. आपल्याला तसा 'अन्नदाता' हातरुमाल मिळाला तर मजा होईल नाहीं? पण फक्त 'मारकुटा'च हातरुमाल मिळाला तर?........

## — अभ्यास —

(१) तुम्हांला म्हातारी काकू आवडली कां म्हातारी आवडली? चार वाक्यांत लिहा.

(२) "जादूचा हातरुमाल तुम्हांला मिळाला तर प्रथम तुम्ही काय मागाल!" असा प्रश्न तुमच्या पांच मित्रांना विचारून त्यांचीं उत्तरें एक ठिकाणीं लिहून काढा.

(३) 'अरेबियन नाइट्स' या पुस्तकांतील 'उडता घोडा' नि उडतीसतरंजी वगैरे गोष्टी वाचून काढा. गंमत वाटेल.

## तीन भाऊ : २

( जर्मन कथा )

तीन भाऊ होते. त्यांच्या मालकीचं असं एक सफरचं-दाचं झाडंच काय तें होतं. ना जमीन ना जुमला, ना घर ना दार. या झाडाला तीन मोठाल्या फांद्या होत्या. मरतांना त्याच्या बापानं तिघांना तीन फांद्या वांटून दिल्या. एकेका फांदीला फळं तीं किती लागणार नि पोट कसं भरणार ? पण जो लहानमोठा भाकरी तुकडा मिळेल तो तिघं मिळून खात. प्रेमानं, गोडी गुलाबीनं रहात. तिघांची वागणूक भली होती. एकमेकाचा हेवा करूं नये, कधीं कोणाचं वाईट चिंतूं नये, आळापीळीनं रात्रीं जागून झाड राखावं नि दिवसां पै पैसा मिळेल तो इमानानें मिळवावा. देवाची करुणा भाकावी. गोरगरीब लुल्या पांगळ्यांना आहे त्यांतलंच घासभर अन्न द्यावं.

एके दिवशीं देवानं त्यांची परीक्षा घ्यायचं ठरविलं. देवानं

आपला दूत पाठविला. एका रात्रीं देवदूत भिकाऱ्याचा वेष घेऊन सफरचंदाच्या झाडापाशीं आला. सर्वांत वडील भाऊ जागा राहून राखण करीत होता. "भुकेनं मरतोय, बाबा, कांहीं खाऊं घालशील?" तो भिकारी बोलला. मोठ्या भावानं आपल्या फांदीवरचीं कांहीं पिकीं फळं तोडून भिकाऱ्याला दिलीं नि म्हणाला, "तुला आणखी दिलीं असतीं रे. माझ्या दोन भावांच्या फांदीवर पुष्कळ पिकीं फळं आहेत पण तीं त्यांच्या नकळत कशी देऊं?" भिकारी म्हणाला, "पुरे, बाळा उपकार झाले."

दुसरे दिवशीं, रात्रीं पुनः तोच भिकारी आला. मधला भाऊ झाडाची राखण करीत होता. भिकाऱ्यानें फळें मागतांच आपल्या फांदीचीं फळें तोडून त्याला देऊन तो म्हणाला, "बाबारे, माझ्या भावांच्या फांदीवर छान फळें आहेत. पण तीं मी कशी तोडूं! चोरी होईल, होय ना?" "नको, मला फळें पुरे झालीं". असें म्हणून आशीर्वाद देऊन भिकारी निघून गेला.

तिसरे दिवशीं तिसऱ्या, सर्वांत लहान भावाची राखण करण्याची पाळी होती. तोच भिकारी तिसरे रात्रींहि आला. त्यानें फळें मागितलीं. आपल्या दोन भावांप्रमाणेंच फक्त आपल्या फांदीवरचीं फळें त्या लहान भावानें दिलीं. तेव्हां त्याचं भलं चिंतून भिकारी संतोषानें निघून गेला.

देवाला समाधान वाटलें. चौथे दिवशीं सकाळीं आपले सर्व बेत देवदूताला नीट समजावून देऊन देवानें त्याला

पृथ्वीवर पाठविलें. एका बैराग्याचा वेष धारण करून देवदूत त्या तिघां गरीब भावांजवळ आला, आणि म्हणाला, "चला पोरांनों, माझ्याबरोबर. तुम्हाला हवं तें मी देणार आहे." तिघां भावांना मोठा अचंबा वाटला. मात्र त्या साधुपुरुषाची तेजस्वी नजर नि पवित्र चर्या पाहून कांहीं पापी शंका त्यांच्या मनांत मुळींच आली नाहीं. आपले फाटके तुटके कपडे घालून ते त्याच्याबरोबर निघाले.

दोन मैल वाट चालल्यावर ते गांवच्या नदीपाशीं आले. नुकताच पाऊस पडून गेल्यानें नदी दुथडी भरून 'थयथयाट' करीत पहात चालली होती. नदीकांठीं उभे राहून साधू महाराज सर्वांत वडील भावाला म्हणाले, "बोल तुला काय हवं ?"

नदी पाहून त्याला एकदम मजेदार कल्पना सुचली. तो म्हणाला, "महाराज, या साऱ्या पाण्याची एकदम उंची दारू होऊं दे."

'तथास्तु' असें म्हणून त्या साधूपुरुषानें आपल्या हातांतील काठी रपकन् पाण्यावर आपटली. तों काय साऱ्या नदीच्या पाण्याची क्षणांत उंची दारू होऊन तिचा मादक घमघमाट जिकडे तिकडे दरवळूं लागला. पहातां पहातां त्या 'मदिरा नदी'च्या कांठीं शेंकडो नोकरलोक ती दारू पिपांत भरूं लागले. इतक्यांत कोठूनशा गाड्याहि आल्या. ते लोक तीं पिपें गाड्यावर चढवूं लागले. या चमत्कारानें त्या तिघां भावांचें डोळे दिपून गेले. साधूमहाराज म्हणाले, "घाबरूं नकोस. ही देवानें दिलेली देणगी आहे. जा तूं एकटा या

सगळ्या ऐश्वर्याचा धनी आहेस. नीट सांभाळ नि सुखासमाधानानं रहा."

तो भाऊ आपल्या उद्योगाला लागण्यासाठीं निघाला. बाकीच्या दोन भावांना साधूमहाराज म्हणाले, "चला मुलांनो, आपण पुढं जाऊं, डोंगरावर".

डोंगरावर चढून खूप चालल्यावर दुसऱ्या बाजूची उतरण सुरूं झाली. त्या उतरणीवरून उतरतांना कबुतरांचा एक मोठा थवा उडतांना त्यांना दिसला. त्याबरोबर त्या मधल्या भावाला साधूनें विचारलें, "बोल, काय हवं?" त्यालाहि युक्ति सुचून तो उतरला, "महाराज, या शेकडों कबुतरांच्या मेंढ्या होऊं देत."

कांहीं मंत्र म्हणून साधू महाराजांनीं हातांतील काठी वर करून हवेंत गिर्रकन् फिरवली. त्याबरोबर सगळीं कबुतरें खालीं पडूं लागलीं आणि हां हां म्हणतां फूगूं लागून, त्या रानांत असंख्य काळ्या भोर मेंढ्या जिकडे तिकडे चरूं लागल्या. महाराज म्हणाले, "बेटा, नशीब काढ. हा धंदा फार बरकतीचा. लोकर कातण्याचा कारखाना काढ. खूप पैसा अडका कर. सुखानं घरदार करून रहा." मग ते सर्वांत धाकट्या मुलास म्हणाले, "चल, आपण पुढं दूर जाऊं."

अनेक डोंगर, टेकड्या, नद्या, नाले, मागें टाकून काट्याकुट्यांतून वाट काढीत ते दोघे चालले होते. अखेर एका ओढ्याकाठीं आल्यावर त्यांनीं वात्सल्यानं त्या तरुण मुलाच्या पाठीवर हात फिरवीत म्हटलं, "खरंच, बाळ, आपण खूप

चाललों नव्हे. खूप दमला असशील तूं. बरं, सांग आतां तुला काय देऊं? "

मुलानें जरा लाजल्यासारखें करून इकडे तिकडे पहात नि मग मान लववून म्हटलें, " महाराज, मला पैसा अडका असलं कांहीं नको. सुखानं संसार करायची इच्छा आहे. सुंदर पण सुशील नि प्रेमळ अशी बायको लाभली तर माझ्यासारखा भाग्यवान् मीच. आणखीन् ........" एवढें बोलून तो मध्येंच थांबला.

" सांग बेटा, असा लाजूं नको. " त्यांनीं धीर दिला.

" आणखीन उगीचच एक माझी वेडी आशा आहे. माझी बायको ही एकाद्या कुलशीलवान राजाची मुलगी असावी. " त्यानें वाक्य पुरें केलें.

साधुमहाराज थोडे हंसून म्हणाले, " बेटा, तुझी मागणी तर छान आहे. पण जरा कठीण आहे. माझ्या पहाण्यांत सुंदर पण सुशील नि प्रेमळ अशा तीनच राजकन्या आहेत. पैकीं दोघींचीं लग्नें झालीं आहेत, एकच लग्नाची आहे. पण तिलाहि दोघा धनाढ्य राजपुत्रांनीं मागणी घातली आहे. बरं, असो. चला पाहूं कांहीं जमत का. "

कंदमुळें खात तब्बल तीन दिवसांचा कष्टाचा प्रवास केल्यावर ते दोघे एका मोठ्या टोलेजंग शहरांत पोहोंचले. साधुमहाराजांनीं त्या तरुणासह राजेसाहेबांची भेट घेऊन

आपल्या येण्याचा हेतू कळवला. हे साधुमहाराज अधुन मधून या राजाकडे येत, नि राजाहि त्यांना आदरपूर्वक वागवी.

" पण तुम्ही आणलेला मुलगा तरी पाहूं दे."

फाटके तुटके (नि प्रवासानें मळके) कपडे घातलेल्या त्या तरुणाकडे साधूमहाराजांनीं बोट दाखविलें. तेव्हां राजे-साहेब हंसून म्हणाले, " काय महाराज, भलतीच थट्टा ही. माझी मुलगी म्हणजे कोणा डोंबाऱ्याची वा वडाऱ्याची विकत आणलेली बेवारशी पोर का आहे, तिचं लग्न अशा भिकारड्याशीं करायला?"

" पण राजा, याच्या पोषाखावर जाऊं नको तूं. याच्या-इतका गुणवान्, भाग्यवान् नि हुषार जांवई तुला दुनियेंत मिळायचा नाहीं."

" पण महाराज, माझ्या एकुलत्या एक राजकन्येला तर यापूर्वींच दोघा राजपुत्रांनीं मागणी घातली आहे. तेव्हां....?" राजानें अडचण सांगितली.

" हात्तेच्या, एवढंच ना. आतां मी सांगतो तुला मार्ग. असं कर. राजकन्येच्या हातून द्राक्षाच्या तीन वेली या तिघांहि वरांच्या नांवानें लाव. चार दिवसांत ज्याच्या नांवाच्या वेलीवर प्रथम द्राक्षें लागतील त्याच्या गळ्यांत तिनं माळ घालावी. काय, कसा आहे बेत?" राजानें व राजकन्येनें साधुमहाराजांची ही आज्ञा मान्य केली. त्याच दिवशीं राज-कन्येच्या हस्तें 'लतारोहण' समारंभ पार पडला.

नि सफरचंद विकणाऱ्या त्या दरिद्री तरुणाचं भाग्य चार दिवसांत द्राक्षांच्या रूपानं उमललं! त्याच्या नांवच्या वेलीवर द्राक्षाचे घोस लोंबूं लागले. नि बाकीच्या दोन वेली सुकून गेल्या. " पाहिलंस राजा, या तुझ्या जांवयाचं भाग्य. "

मोठ्या थाटामाटानें विवाहसमारंभ पार पडला. आणि मग साधुमहाराज एके दिवशीं हळूंच नाहींसे झाले!

× × ×

या गोष्टीला ७–८ वर्षं लोटली. देवाला पुनः आपल्या या तीन भक्तांची कसोटी पहायची इच्छा झाली. त्यानं दूताला भिकाऱ्याच्या वेषानं पाठवून दिलं. एका अत्यंत कडाक्याच्या थंडीच्या रात्रीं एक उघडाबोडका जख्खड म्हातारा भिकारी अगदीं चिंधड्या झालेली एक कफनी अडकवून, कसा बसा काठी टेकीत टेकीत सर्वांत वडील भावाच्या 'मदिरा-नगरीं' तील भव्य दुकानापाशीं आला. थंडीच्या रात्रीमुळें 'पिणाऱ्या' गिऱ्हाईकांची नुसती ही रीघ लागली होती. मालक एका उंची खुर्चीवर बसून समोरच्या गल्ल्यावरील नाण्यांचे प्रचंड ढीग मोजण्यांत गर्क झाले होते.

"अहो मालक, भगवान मायबाप, धनि, गरीबाला एक घोट दारू द्या. धर्म करा. देव तुमचं भलं करील. थंडींत मरतोय हो मी. एकच घोटभर द्या. ऊब येईल. प्राण वाचेल." अशी केविलवाण्यास्वरांत याचना करून त्या म्हाताऱ्या भिकाऱ्यानें आपलें फुटकें मोडकें 'टिन पॉट' पुढें केलें.

प्रथम त्याच्याकडे कोणीच लक्ष दिलें नाहीं. तेव्हां भिकाऱ्यानें पुनः पुनः अधिक काकुळतीनें मागणी करायला सुरवात केली. त्यामुळें मालक एकदम मान वर करून त्या भिकाऱ्यावर खेंकसला, " सदान्‌कदा या भिकाऱ्यांनीं असं डोकं उठवलंय. होतोस कीं नाहीं चालता, सगळ्यांना अशी फुकट दारू वाटायला पाणपोई नाहीं काढली इथं ? नि अशी फुकट दारू वाटून मला भीक नाहीं मागायची तुझ्या सारखी. चल, चालता हो आधीं. "— नि तो चालता होण्याची वाट न पहातांच नोकराकडून धक्के मारून त्याला वाटेस लावले. हा 'मालक' आतां मोठा उन्मत्त झाला होता. भिकाऱ्यांनाच नव्हे तर कोणा नोकरालाहि एक थेंबभरहि दारू कधीं मोफत मिळत नसे त्याच्या त्या 'मदिरानगरीं' त ! नि कसाबालाहि लाजवील अशी नोकरचाकराशीं त्याची वागणूक !

× × ×

भिकारी कोलमडत, ठेंचकळत, नि कण्हत कुंथत डोंगर उतरून पलीकडे असलेल्या एका प्रचंड लोकरीच्या गिरणीपाशीं आला. गिरणींत रात्रपाळीचें काम झपाट्यानें चाललें होतें. गिरणीपलीकडेच अनेक लहान लहान झोपड्या नि प्रासादतुल्य अशी 'शेठा' ची सात मजली हवेली उभी होती. 'गुरुकृपा' अशी निळी पाटीहि तिजवर विजेच्या रोषणाईंत झळकत होती. हा मालक आतां 'क्रोडोपती' झाला होता. 'शेठा'च्या बंगल्यापर्यंत प्रवेश मिळविण्यासाठीं भिकाऱ्याला कित्येकांच्या मनधरण्या कराव्या लागल्या. पण मोठ्या

मो. क्र. ... नों दि ...
वि. ...

चातुर्यानें तो हवेलीच्या दाराशीं पोहोंचला. दारें खिडक्या थंडीमुळें बंद होतीं. आंतलीं सर्व माणसें बहुतेक झोंपलीं असावींत. म्हणून त्या शांत रात्रीं भिकाऱ्यानें मोठ्यानें गर्जना केली, " अहो, शेठ साहेब, लाखाचे पोशिंदे,........ "

व्यापाराच्या विवंचनेनें नेहमींच नीट न झोंप येणारा 'शेठ' तिसऱ्या मजल्यावरील पराच्या मऊ गाद्यावर अस्वस्थपणें तळमळत होता. त्याला ती हांक लगेच ऐकूं गेली. अशावेळीं इथें कोणाला येऊं न देण्याचा त्याचा नोकरांना सक्त हुकूम असे. म्हणून नोकरांच्या गाफिलपणावर चरफडतच त्रासिक-पणें शेठ उठला नि खिडकी अर्धवट उघडून त्यानें खालीं पहात कावून विचारलें, " कोण ? काय काम आहे ? "

" एक भिकारी, धनि, अहो शेठ, थंडीनं कुडकुडतोय. अंगावर पटकूरबी नाहीं. कसलंबी फाटकं तुटकं जुनंपानं एक कांबळं द्या. देव तुमचं भलं करील. "

आपल्या सारख्या 'बड्या शेठा' कडं इतक्या रात्रीं भीक मागायला येण्याचं धाडस करणाऱ्या भिकाऱ्याचा शेठाला अत्यंत राग आला. " ठेवलंय तुझ्या बापानं कांबळं. " असें म्हणून आपले मौलिक शब्द अधिक खर्ची न घालतां त्यानें फटकन खिडकी लावून टाकली आणि पहारेकऱ्यांना बोलावून भिकाऱ्याला प्रवेश दिल्याबद्दल त्याची चांगली हजेरी घेतली. परिणाम व्हावयाचा तोच झाला. पहारेकऱ्यांच्या चाबकानें भिकाऱ्याची चामडी मात्र चांगलीच लोळवली.

त्या ‘ कसाबा ’ च्या हातून आपली कशीबशी सुटका करून घेत तो म्हातारा भिकारी पुनः वाटेला लागला. नि बरेच मैल वाट चालल्यावर एका डोंगराच्या पायथ्याशीं असलेल्या एका खेड्यांत पोहोंचला. एका खोपटीपाशीं येऊन त्यानें दारावर थाप मारली. तोंच आंत कांहीं खडबडलें. थोड्यांच वेळांत दार उघडलें. प्रकाश दिसूं लागला. एक भिणमिणती पणती घेऊन एक सुंदर तरुण स्त्री उंबरठ्यांत उभी राहून त्या भिकाऱ्याकडे पाहूं लागली. तिच्याच मागोमाग एक धट्टाकट्टा जवान तरुणहि बाहेर आला. ‘ हीच राजकन्या नि हाच सर्वांत ‘ धाकटा भाऊ ’–तिचा नवरा,– यांची ओळख भिकाऱ्याला तेव्हांच पटली.

“ आजोबा, काय हवं ? ” त्या स्त्रीनें विचारलें.

“ अग, त्यांना असं काय बरं आपण विचारावं, या आजोबा आंत या आधीं. थंडीनं किती हुडहुडी भरली आहे तुम्हाला ” असें म्हणून पुढें होऊन, त्या तरुणानें भिकाऱ्याचा हात धरून आंत आणलें व आपल्या बिछान्यावर बसविलें. तो बायकोला म्हणाला, “ जा, आधीं शेकोटी कर, पाव्हण्यांना आपण थोडी ऊब देऊं म्हणजे बरं वाटेल. थंडी कोण मी मी म्हणते आहे. कहर मांडलाय तिनं. ” बायकोनें शेकोटी पेटवली. नवऱ्यानें चिंध्याच्या पुरचुंड्यांनीं आजोबांने हातपाय शेकले. म्हातारा जरा ताजातवाना दिसूं लागला. तो म्हणाला, “ लेकरांनों, देव तुमचं भलं करील. ”

" थांबा आजोबा, तुम्ही माझ्या बिछान्यावर जरा आडवे व्हा. "

" नि तूं रे कोठें झोपशील ? " त्यानीं विचारलें.

"त्याची नको काळजी आजोबा" असें म्हणत त्यानें बळेंच आजोबांना आपल्या बिछान्यावर झोंपवून त्याच्या अंगावर आपली फाटकी वाकळ व्यवस्थित घातली. " थांबा हं जरा, आजोबा, लापशी होत आली आहे. ती प्या नि झोपा. " घरधनिण प्रेमळपणानें बोलली.

त्या सुशील नि कर्तव्यदक्ष गृहिणीनें केलेल्या त्या लापशीचे भुरके मारीत असतां म्हाताऱ्याची कळी खुलूं लागली.
" आजोबा इतक्या रात्रीं कुठून आलांत ? बरेच दमलेले दिसताय तुम्ही ! लापशी घ्या, मग अंमळ पाय चेपतों मी. म्हणजे बरं वाटेल बघा तुम्हाला. " तो तरुण म्हणाला.

" नको रे बाळानों, तुमचे उपकार कसे फेडूं. उगीच त्रास दिला बघा. झोपमोड केली तुमची. आतां बाहेर उजाडूंहि लागलंय. एवढी लापशी घेऊन वाटेला लागतो मी. माझं गांव खूप खूप दूर आहे. "

" छेः हे काय आजोबा, तुम्ही इथं खुशाल रहा चार दोन दिवस. आमची गरीबाची मीठभाकर कधीं कमीं व्हायची नाहीं. मी इथंच कुणाच्या शेतावर मोलमजुरी करतों, ही ' घरधनिण ' शेणी लावते, पैसा अडका नाहीं पण मजेनं

रहातों बघा आम्ही. तसं म्हटलं तर माझी ही घरधनिण माहेरची........"

तों दूर उभ्या असलेल्या त्याच्या बायकोनें एकदम डोळ्यानें खूण केल्यामुळें त्यानें आपले बोलणें मध्येंच थांबविलें. तोंच दारावर कोणी 'टक् टक्' केलें तरुणानें दार उघडलें. सरकारी पोषाख घातलेला एक शिपाई पत्र घेऊन आला होता. दारांत एक चार घोड्यांची ऐटबाज गाडी उभी होती नि तिच्याहि मागें पुढें निळा गणवेष घातलेले दहा पांच शिपाई उभे होते. तरुणानें घाबरुन विचारलें, "काय, माझ्याकडं ?" न बोलतांच शिपायानें पत्र त्याचें हातीं दिलें. तरुणानें लखोटा उघडून पत्र मनांत वाचलें व मग हंतरुणावर असलेल्या म्हाताऱ्या भिकाऱ्याला व बायकोला तें पत्र मोठ्यानें वाचून दाखविलें. पत्र राजेसाहेबांकडून त्याच्या प्रत्यक्ष सासऱ्याकडून आलें होतें. जांवयानें आजवर, आपण देऊं केलेली एक पैहि घेतली नाहीं, पण आपणांस या मुलीखेरीज अपत्य नसल्यानें, मरणापूर्वीच जांवयानें राज्यावर बसावें अशी इच्छा व्यक्त केली होती. इतकेंच नव्हे, राज्याभिषेकाचा मुहूर्तहि जवळचाच निश्चित करून, तातडीनें निघून येण्याबद्दल पुनः पुनः आर्जवानें पत्रांत लिहिलें होतें. हें पत्र वाचतांच तो सालस तरुण अगदींच गांगरल्यासारखा झाला. तेव्हां म्हातारा भिकारी त्याच्या पाठीवरून हात फिरवीत धीर देत म्हणाला, "पाहिलंस, बेटा, भाग्य अस सज्जनां घरीं चालून येतं. दुर्जनांपासून मात्र असलेलं भाग्यसुद्धां दूर पळतं. चल माझा

आशीर्वाद आहे. आतां विचार करत बसूं नको. राजलक्ष्मी नि ही तुझी गृहलक्ष्मी यांच्या मंगल सहवासांत सुखासमाधानानं रहा. मात्र मनानं आतां आहेस असाच रहा. ” थोड्यावेळानं त्या गरीब भिकाऱ्यालाहि आपल्याबरोबर चलण्याचा तीं दोघं आग्रह करूं लागलीं. पण त्यानें तें साफ नाकारलें. तेव्हां निरुपायायानें त्याचा निरोप घेऊन तें गरीब जोडपें राज्यपद भोगण्यासाठीं गाडींत बसलें.

× × ×

दुसरे दिवशीं काय विलक्षण चमत्कार ! त्याच सफरचंदाच्या झाडापाशीं झाडाचे दोन मालक विषण्ण मुद्रेनें उभे होते. त्यांचे कपडे पूर्वीसारखेच फाटके व मळके होते. दोघे भाऊ एकमेकाकडे शून्य दृष्टीनें टकमकां पहात होते. बऱ्याच वेळाने मधला भाऊ ‘दादाला’ म्हणाला, “ तूं इथं कसा ? ”

“ काय सांगूं माझं दुर्दैव ” ‘दादा’ उत्तरला, “ नदीला महापूर येऊन एका रात्रींत सारी उलटापालट झाली. नदींतून वहाणाऱ्या दारूचं पाणी झालं एवढेंच नव्हे तर पाणी असं प्रचंड वाहूं लागून काठावर मी वसवलेलं ‘ मदिरानगर ’ माझं दुकान, माझी माणसं, घरदार, बायकामुलं साफ वाहून गेलं. काय करूं, नशीब ! सकाळीं उठून असा इथं आलों. पण तूं कसा आलास भाऊ ? ”

“ काय सांगूं दादा, त्या डोंगरापलीकडं केवढा मोठा लोकरीचा कारखाना नि मेंढ्यांचीं खिल्लारं होतीं माझीं, पाहि-

लीस ना ? पण काल रात्रीं अचानक इंजिनांत बिघाड होऊन तें थाडकन उडालं नि जळतं पेट्रोल सगळीकडं उडून आग लागली. हां हां म्हणतां आग भराभर फोंफावत जाऊन गिरणी, घरदार, झोपड्या, लोक, मेंढ्या, इतकंच काय माझी, बायको मुलं सारं सारं कांहीं आगीनं भस्मसात केलें. काय करूं रे, मी तरी पळत सुटलों म्हणून बचावलों बघ. हंतरुणांत झोपलों होतों तेव्हां झालं हें. कपडे करायला सुद्धां वेळ मिळाला नाहीं. भाऊ, दुर्दैव कसं रें कोसळलं असं एकाएकीं आपणांवर. काय करूं रे ? ”

असं म्हणून ते दोघे एकमेकाच्या गळ्यांत गळा घालून रडूं लागले. दुःखाचा भार जरा ओसरल्यावर ‘ दादा ’ला धाकट्या भावाची आठवण झाली. डोळे पुशीत पुशीत तो म्हणाला, “ खरंच भाऊ, आणि आपला धाकटा भाऊ, ‘ बाळ ’ कुठं असेल रे ? ”

मधला भाऊ कांहीं बोलणार तोंच आदल्या रात्रीं आलेला म्हातारा भिकारी काठी टेकीत टेकीत कोठूनसा तेथें येऊन म्हणाला, “ बाबानों, त्याची नको तुम्हाला काळजी. तो राजा झाला आहे त्रिखंडाचा. तुम्ही मात्र मागा भीक जन्मभर ! ”

— अभ्यास —

( १ ) गरिबींत माणूस बरा असतो तसा श्रीमंतींत नसतो हें कसें खरें आहे तें या गोष्टीवरून तुम्हांला कळून येईल.

( २ ) तिसरा धाकटाभाऊ शेंवटीं राजा झाला त्यानंतर तो कसा वागला असेल याचें थोडक्यांत तुम्हीच लिहा.

( ३ ) ‘ दया ही चांगली कीं वाईट [illegible] डासा वादविवाद करा.

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible]
दा. क्र. 3920 — [illegible]
वि. ..... आ वा, क्र.
IRBK-0103127
IRBK-0103127